जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - १३७ दिनांक - २६/०२/२०२४

वारजे माळवाडी पोलीस स्टेशन

# टोळी मधील सराईत गुन्हेगारांना केले गजाआड

दि. २२/०२/२०२४ रोजीचे मध्यरात्री रामनगर वारजे भागातील अचानक चौक व शिवाजी चौक मधील सराईत गुन्हेगारांमध्ये पुर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून एकमेकांना धारदार हत्याराने, लाकडी बांबूने व विटांनी हाणमारी करून तेथे पार्क केलेल्या गाड्यांची तोडफोड करून नुकसान केले व सदर परिसरामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले.हाणामारी मध्ये रामनगर शिवाजी चौकातील टोळीचा आकाश रविंद्र दिवेकर वय- २८ वर्षे हा जबर जखमी झाल्याने त्याचा बदला घेण्याकरीता रामनगर शिवाजी चौकातील टोळीने रामनगर अचानक चौकातील टोळीचा सागर दिलीप कांबळे याचेवर जिवे ठार मारण्याचे हेतूने हल्ला केला. दोन्ही टोळीं विरुध्द वारजे माळवाडी पोलीसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दाखल गुन्ह्यांचा तपास सुरु असताना दोन्ही टोळीं मधील सराईत गुन्हेगार गुन्हा करून मध्यरात्रीनंतर पसार झाले होते. वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे तपास पथकाने मध्यरात्री नंतर सदर गुन्हेगारांचा शोध सुरु केला. तपास पथकाने अवघ्या ४ तासात तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदारांचे मदतीने दोन्ही टोळी मधील आरोपींना शिताफिने ताब्यात घेतले.त्यामध्ये रामनगर अचानक चौकातील टोळीचे **१)अमरजित मुन्ना सिंग, वय- २३ वर्षे व २)रोहन अनिल चव्हाण, वय- २५ वर्षे, दोघे रा. अचानकचौक, रामनगर वारजे पुणे** यांना गुरनं ७९/२०२४ भादंवि कलम ३२६,१४३,१४७,१४९, ३३६,३२३,५०४ ४२७,आर्म ॲक्ट ४(२५), मपोकाकलम ३७(१)(३)सह १३५,क्रि.लॉ.अमें.ॲक्ट कलम ७ प्रमाणे दाखल गुन्ह्यात अटक केली आहे. तसेच रामनगर शिवाजी चौकातील टोळीचे **१)धनंजय ऊर्फ धनाजी नागनाथ सुर्यवंशी, वय- २९ वर्षे, रा. गणेशपुरी सोसायटी रामनगर पुणे, २)हेमंत ऊर्फ विकी धर्मा काळे, वय- २६ वर्षे, ३)युवराज धर्मा काळे, वय- २४ वर्षे, ४)अक्षय ऊर्फ अवधूत महेश यादव, वय- २९ वर्षे, ५)कुंदन ऊर्फ सोन्या शिवाजी गायकवाड, वय- २६ वर्षे, ६)संजय ऊर्फ बाबू विकास चव्हाण, वय- २० वर्षे सर्व रा. शिवाजी चौक, रामनगर वारजे पुणे** यांना ताब्यात घेवून गुरन ८०/२०२४ भादंविकलम ३०७,३२४,३२३,५०६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,४२७, आर्म ॲक्ट ४(२५), मपोकाकलम ३७(१)(३)सह १३५, क्रि.लॉ.अमें.ॲक्ट कलम ७ प्रमाणे दाखल गुन्ह्यात अटक केली आहे. यामध्ये ०३ अल्पवयीन बालकांचा देखील समावेश असून त्यांना तपास कामी ताब्यात घेण्यात आले आहे. इतर पाहिजे आरोपींचा शोध सुरु असून दाखल गुन्ह्यांचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मनोज शेडगे व म.पोलीस उप निरीक्षक अनिता दुगांवकर हे करत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री. प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ३, पुणे शहर श्री. संभाजी कदम, मा.सहा. पोलीस आयुक्त, कोथरुड विभाग, पुणे शहर.श्री. भिमराव टेळे, यांचे मार्गदर्शना खाली वारजे माळवाडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.मनोज शेडगे, सहा. पोलीस निरीक्षक सचिन पाटील, तपास पथक प्रभारी अधिकारी पो उप निरी रामेश्वर पार्वे व त्यांचे पथकातील पोलिस अंमलदार प्रदिप शेलार, भुजंग इंगळे,विजय भुरुक, श्रीकांत भांगरे, संभाजी दराडे, विक्रम खिलारी, अजय कामठे, सत्यजित लोंढे, गणेश कर्चे, किशोर नेवसे व योगेश वाघ यांनी केलेली आहे.